# IMR CAMPUS

**IMR Campus Newsletter Publish by** Director : Prof.Dr.Shilpa Bendale, Editor: Dr. Shama Saraf, Editorial committee: Anilkumar Marthi, Dr. Varsha Pathak, Dr. Anupama Chaudhari, Students Representive : Ketan Deshmukh, Sachin Mahajan, Shivani Bhavsar. **This Newsletter Publish for KCES's Institute of Management Research, Jalgaon inhouse use.**

**Institute's Vision:** Committed to provide value based, quality, professional and technical education to the students and empowering them with the reputed skillsets and competencies to face challenges of the fast changing global environment.

**Institute's Mission:** • To provide necessary technical and professional education with a view to uplifting the lives of rural and urban students. • To create conducive platform for students to develop their skills and knowledge. • To encourage innovation and research aptitude among students. • To inculcate global ethics and human values in all the learners.




**राज्य नाट्य स्पर्धेचा निकाल जाहीर :** दीपाली पाटील ठरली सर्वोत्कृष्ट दिग्दर्शिका

## आयएमआरचे 'द फोर्थ वे' नाटक ठरले केंद्रावर प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क


अमरसिंग राजपूत


अमोल ठाकूर


दीपाली पाटील


अमृता भावे


अंकुश काकडे


अश्विनी कोल्हे



**जळगाव :** ५७ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या प्रथम फेरीचे निकाल सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे बुधवारी जाहीर करण्यात आले. यामध्ये जळगाव केंद्रातून केसीई सोसायटीच्या आय.एम.आर.महाविद्यालयाच्या 'द फोर्थ वे' या नाटकाला प्रथम पारितोषिक मिळाले आहे. तसेच या नाटकाची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेत जयखेडे येथील समर्थ बहुउद्देशीय संस्थेचे 'उंच माझा झोका गं' या नाटकास व्दितीय तर डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाचे 'ए मायनस अ' या नाटकाला तृतीय पारितोषिक मिळाले आहे.

६ ते २० नोव्हेंबर दरम्यान

### स्पर्धेचा निकाल

**1** सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून 'द फोर्थ वे' या नाटकासाठी दीपाली पाटील यांना प्रथम पारितोषिक मिळाले आहे. द्वितीय पारितोषिक 'उंच माझा झोका गं' या नाटकासाठी विशाल जाधवला मिळाले आहे. प्रकाश योजनेसाठी 'द फोर्थ वे' साठी सचिन महाजन यांना प्रथम तर 'ए मायनस अ' साठी चैताली क्षीरसागरला व्दितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.

**2** नेपथ्यासाठी 'ह्या साल्या एनर्जीचे करायचे काय' या नाटकासाठी बाळकृष्ण तिडके यांना प्रथम तर 'उंच माझा झोका ग' साठी अंकुश काकडे यांना व्दितीय क्रमांक प्राप्त केला. उत्तम रंगभूषेसाठी 'पुनरपी उ:शाप'साठी श्रध्दा कदम यांना प्रथम तर 'जीत'साठी संजय चव्हाण यांना व्दितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

**3** उत्कृष्ट अभिनयासाठी 'द फोर्थ वे' या नाटकासाठी अमरसिंह राजपूत व 'उंच माझा झोका गं' या नाटकासाठी अमृता भावे यांना रौप्यपदक मिळाले आहे.



# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ स्तरीय नाट्य प्रशिक्षण कार्यशाळा













## 'आयएमआर'मध्ये 'वेणी' एकल प्रयोग



Our Alumni Nupur Pande Present Drama -VENI @ IMR



IMR Baseball Wining Team



University Player - (Badminton) Monali Bohara

# के.सी.ई. आय.एम.आर. मध्ये बेटी बचाओ, बेटी पढाओ अंतर्गत स्वाक्षरी मोहीम आणि रॅली






आपल्या देशात सातत्याने कमी होणारा मुलींचा जन्मदर आणि खान्देशातील मुली संदर्भातील मानसिकता सुधारण्यासाठी चालवले जाणारे अभियान आणि आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिम्मित्त आय.एम.आर मध्ये बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियाना अंतर्गत बालिका सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत संस्थेमध्ये स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. त्याचे उद्घाटन विद्यार्थीनी प्रतिनिधी सोनल भानुशाली, प्राजक्ता पांडे, पूजा पाठक आणि संचालक प्रा.डॉ. शिल्पा बेंडाळे ह्यांनी स्वाक्षरी करून केले. तसेच संस्थेचे प्रा. डॉ. शमा सराफ, प्रा. डॉ. शुभदा कुळकर्णी, प्रा. खुशबू बांगर, प्रा. दिपाली पाटील, प्रा. पुष्पलता पाटील, प्रा. रोहिणी बोडस , प्रा. प्रियंका खरारे , प्रा. स्वप्नील काटे, श्री. विजय पाटील ह्यांनी ह्या उपक्रमात आपला सहभाग नोंदवला.

ह्या कार्यक्रमाअंतर्गत रांगोळी स्पर्धा – आणि ह्यासाठी विषय म्हणून विध्यार्थ्यांनी मदर तेरेसा, कल्पना चावला, प्रतिभाताई पाटील, लता मंगेशकर, अनिमा पाटील, ह्यांना रांगोळी स्वरुपात विद्यार्थीनी रेखाटली आहे. आणि तसेच ही व्यक्तिमत्व पोस्टर स्पर्धेत सुद्धा विद्यार्थ्यांनी रंगवले आहे. तसेच या संदर्भात त्या पुढील दोन दिवस व्याखाने आयोजित करण्यात आली. आय.एम.आर.च्या प्राध्यापकांनी विविध शाळामध्ये जाऊन हे व्याख्याने दिलीत.

# के.सी.ई. चे आय.एम.आर. मध्ये व्यवस्थापनशास्त्र व संशोधनावर २ दिवसीय कार्यशाळा.

दिनांक १७ आणि १८ नोव्हेंबरला के.सी.इ. आय.एम.आर. मध्ये व्यवस्थापनशास्त्रतील संशोधनावर कार्यशाळा संपन्न झाली/ कार्यशाळेचे उदघाटन के.सी.इ. व्यवस्थापन समिती सदस्य ॲड. सुनील पाटील तसेच संचालक प्रा. डॉ. शिल्पा किरण बेंडाळे आणि प्रथम सत्राचे वक्ते डॉ. सचिन कांबळे, द्वितीय सत्राचे वक्ते डॉ. राहुल खंडेलवाल, डॉ. राजगोपाल, तिसऱ्यासत्राचे वक्ते डॉ. रामप्रकाश नायर उपस्थित होते. ह्याप्रसंगी बोलताना ॲड. सुनील पाटील ह्यांनी उ.म.वि. परिक्षेत्रातील सर्व प्राध्यापक संशोधकांचे अभिनंदन केले की त्यांनी अतिशय उत्तम विषय निवडून संशोधनाला प्रारम्भ केला. आणि त्यांच्या संशोधनाला शुभेच्छा दिल्या.









जळगाव जनता सहकारी बँक, आय.एम.आर. यांचा संयुक्त उपक्रम

सोशल मीडिया दुधारी तलवार–डॉ. सोमनाथ वडनेरे



Arun Nalawade welknown Actor and Sensor-President @ IMR





Communication skill workshop by Devdatta Gokhale



जी.एस.टी.तील मुख्य तरतुदी - वक्तेः C.A. अनिल शाह







Blood Donation @ IMR

Karate Class @ IMR

## आय. एम. आर. ने पोखरी तांडा गावातील बचत गट महिलासांठी घेतलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे क्षणचित्रे





पोखरी तांडा हे आदिवासी बहुल गाव आय. एम. आर. ने दत्तक घेतले. या उपक्रमात तिथल्या महिलांसाठी बचत गट प्रशिक्षण, आरोग्य तपासणी शिबिर,मोफत सॅनिटरी पॅड हे नियमित प्रोजेक्ट घेण्यात आले. डॉ वर्षा पाठक, डॉ शमा सराफ, दिपाली पाटिल यांनी आपल्या विद्यार्थ्यांसह हा उपक्रम डायरेक्टर प्रा डॉ शिल्पा बेंडाळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवला.

## के.सी.इ.चे आय.एम.आर.च्या रोटरॅक्ट क्लबचा पदग्रहण समारंभ





मातोश्री वृद्धाश्रमात सेवा देतांना आय.एम.आर.चे रोटरॅक्टर्स

**अध्यक्षपदाची सूत्रे दिपाली पाटील तर सचिव म्हणून अश्विनी धांडे ह्यांनी स्वीकारली.**

ह्या वर्षी २०१७ चा के.सी.इ.चे आय.एम.आर. च्या रोटरॅक्ट क्लब चा पदग्रहण समारंभ आय.एम.आर. ऑडीटोरियम मध्ये **TV 9** चे प्रोडक्शन हेड आणि आय.एम.आर.चे माजी विद्यार्थी विशाल पाटील आणि के.सी.इ.चे आय.एम.आर. चे संचालक प्रा.डॉ.शिल्पा बेंडाळे ह्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. त्यावेळी विशाल पाटील ह्यांनी मार्गदर्शनपर सामाजिक कार्यातून, विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते. त्याचा पुढील आयुष्यावर निरंतर परिणाम होत असतो, त्यामुळे भरपूर कार्यक्रमात भाग घ्या , जेव्हा संधी मिळेल तेव्हा व्यासपीठावर या, त्यातून तुमची स्वतःची व्यक्तिमत्वाची शैली घडवा. असे सांगितले.







आय.एम.आर. आणि सकाळ वृत्तपत्र संयुक्त विद्यमाने वादविवाद स्पर्धा